वर्ष-०९ | अंक-१९ | मुंबई, मंगळवार २८ मार्च ते ०३ एप्रिल - २०२३ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

# POLICE BATMI PATRA

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
शौचालाच न होणे हेसुद्धा असू शकते कोलन कॅन्सरचे लक्षण; शरीराचे हे 5 संकेत पहिल्याच टप्प्यावर ओळखा

3 → आरोग्याचे डोही : 'पॅथी'चा संघर्ष की संवाद?

आटपाडीत गावठी पिस्तुलासह तीन जिवंत काडतुसे घेऊन जाणाऱ्या दोघांना अटक, साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## नागपूरच्या तीन सराईत गुन्हेगारांना अटक



वर्धा:शहरात गुन्हा करण्याच्या हेतूने आले खरे, मात्र पोलीसांना वेळीच खबर लागल्याने नागपूरचे पंकज प्रभाकर साठवणे, मिलिंद प्रेम हिराणी व आकाश ज्ञानेश्वर बांगडे हे जाळयात अडकले. या तिघांची अट्टल गुन्हेगार म्हणून ...पान २ वर...

## भूमाफियाने खोदलेल्या खड्ड्यात पडून बालकाचा मृत्यू; दोषी भूमाफिया मोकाट



ठाणे : मृतक रेहान अमीन शेख हा कल्याण पूर्वेतील आयडीएल हायस्कूलमध्ये इयत्ता ५वीत शिक्षण घेत होता. २५ मार्च रोजी तो सकाळच्या सुमारास कल्याण पूर्वेतील कैलाश नगर मधील रवी हॉटेलच्या समोर, राय पॅराडाईजच्या बाजूला असलेल्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडलेला बॉल काढत असताना, त्याचा पाय घसरून तोही पाण्यात पडला होता. त्यामध्ये त्याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. हा खड्डा बेकायदा बांधकामासाठी भूमाफियांनी खोदला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. खड्ड्याला कोणत्याही प्रकारचे संरक्षण कडे नसल्यानेच ही घटना घडली. मात्र, कोळसेवाडी पोलिसांनी खड्डा खोदणाऱ्या विरोधात कारवाई न करता रेहानचा मृत्यू आकस्मित झाल्याची नोंद केली. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त ...पान २ वर...

## ट्रॉलीचा धक्का लागल्याच्या वादातून कामगाराची हत्या, आरोपीला अटक

ठाणे : कामगाराच्या हत्ये प्रकरणी भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून फरार आरोपी कामगाराला काही तासातच पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मोहम्मद हनीफ इस्माईल (वय, २४) असे अटक केलेल्या आरोपी कामगारचे नाव आहे तर शफाउद्दीन राहत हुसेन (वय ३१) असे मृतक कामगाराचे नाव आहे. दोघेही उत्तर प्रदेशचे : पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार




मृतक शफाउद्दीन आणि आरोपी मोहम्मद हनीफ हे दोघेही मूळचे उत्तर प्रदेश मधील बाराबंकी जिल्हातील रहिवाशी असून ते सोनाळे गावातील वेगवेगळया चाळीच्या खोलीत राहत होते. हे दोघेही उदरनिर्वाहसाठी भिवंडी तालुक्यातील सोनाळे गावाच्या हद्दीत असलेल्या माल्टा कंपनीत काम करीत होते. २६ मार्च (रविवारी ) नेहमी प्रमाणे कंपनीत काम करत असताना दुपारी ११ च्या सुमारास मृतक शफाउद्दीन हा कंपनीतील एका ट्रॉलीमध्ये साहित्य टाकून नेत असताना अचानक आरोपी कामगार मोहम्मद हनीफ याला ट्रॉलीचा धक्का ...पान २ वर...

## अदानी-मोदी नवा अंक सरू

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत जनतेला फसवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना जी शिक्षा झाली आहे त्याचा उद्योगपती गौतम अदानींशी काहीही संबंध नाही, असे प्रत्युत्तर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी शनिवारी दिले.राहुल गांधी यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन मी विचारपूर्व क बोलतो, असे विधान केले होते. हाच धागा पकडून रविशंकर प्रसाद यांनी राहुल गांधींवर टीका केली. ते म्हणाले की, राहुल गांधींनी पत्रकार परिषद घेत खोट्या आणि निराधार विधानाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या स्वभावानुसार सर्व जनतेला फसवण्याचा प्रयत्न केला आहे. मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर होत असलेल्या आरोपांवर ते काहीच बोलले नाहीत. राहुल गांधी यांनी २०१९च्या वेळी एका भाषणादरम्यान केलेल्या विधानामुळे त्यांना शिक्षा



झाली आहे. ते पुढे म्हणाले की, राहुल गांधी बोलले होते की सर्व मोदी आडनाववाले चोर आहेत. मोदी आडनाववाले बिहार, भारत, पश्चिम भारत आणि मागासलेल्या भागातून येतात. राहुल गांधींनी केलेल्या विधानामुळे या मागासवर्गीय लोकांचा अपमान झाला होता. राहुल गांधींना भरसभेत त्यांच्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, पण अपशब्द वापरण्याचा अधिकार नाही. राहुल गांधींना अपशब्द वापरण्याचा अधिकार असेल तर पीडितांना न्यायालयात ...पान २ वर...

## कारवर पोलीस नावाचं स्टीकर अन् अंबर दिवाही, पथकाने पकडताच समोर आली धक्कादायक माहिती



छत्रपती संभाजीनगर पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने एका तोतयाला बेड्या ठोकत अटक केली आहे. विशेष म्हणजे हा तोतया चोर कारवर पोलीस नावाचं स्टीकर लावून अंबर दिवा गाडीत ठेवून मिरवत होता. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून चोरीची एक स्कॉर्पिओ देखील ताब्यात घेतली आहे. संजय ऊर्फ मदन सुंदरराव पोपळघट (वय 33 वर्षे, रा. राऊतनगर, जालना, ह. मु. व्यंकटेशनगर रेसिडेन्सी, हिरापूर शिवार) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रेकॉर्डवरील संजय ऊर्फ मदन सुंदरराव पोपळघट या तोतयाला गुन्हे शाखेने गजाआड केले. त्याच्याकडून कार, दुचाकी, लोखंडी पिस्टल, पोलिस कॅप, अंबर दिवा, असा 10 लाख 90 हजार 995 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहन चोरायचे आणि त्यावर बनावट क्रमांक टाकून पोलिस नावाचे स्टिकर लावून ...पान २ वर...

## पुण्यात मसाज सेंटरवर छापा



पुण्यातील परदेशी नागरिक नोंदणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी खासगी मसाज सेंटरवर छापा टाकला. कोंढवा परिसरातील या खासगी स्पामध्ये परदेशी महिला वैध व्हिसाशिवाय काम करताना आढळल्या. या महिलांकडून वेश्याव्यवसाय करुन घेतला जात असल्याचं सांगितलं जात आहे. तत्पूर्वी व्हिसा कागदपत्रांची पूर्तता न केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली. फॉरेनर्स रजिस्ट्रेशन ऑफिसच्या (F R O ) अधिकाऱ्यांनी शुक्रवारी 24 मार्च रोजी शहरातील कोंढवा भागातील एका खाजगी स्पावर छापा टाकला होता. या छाप्यादरम्यान अवैधरित्या परदेशी महिलांना नोकरीवर ठेवण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात विदेशी व्यक्ती अधिनियम कायद्यानुसार गुन्हा नोंद केला आहे. परदेशी नागरिक नोंदणी विभागाच्या नियमावलीनुसार परदेशी व्यक्तीने नोकरी करण्यासाठी व्हिसा संदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचं आहे. परंतु, कागदपत्रांची पूर्तता न केल्याने त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्यातील 1994 सालच्या राठी हत्याकांडातील आरोपी अल्पवयीन, 28 वर्षांनी तुरुंगातून सुटका करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

पुण्यातील गाजलेल्या राठी मर्डर केसमध्ये (Rathi Murder Case Pune) एक मोठी अपडेट आली आहे. गुन्हा ज्यावेळी घडला होता त्यावेळी आरोपी हा अल्पवयीन होता हे सिद्ध झाल्यानं न्यायालयाने या प्रकरणातील आरोपीला तात्काळ सोडण्याचे आदेश दिले आहेत. नारायण चेतनराम चौधरी असं या आरोपीचं नाव असून त्याने 28 वर्षे तुरुंगात घालवली आहेत. आज त्या आरोपीला सोडण्याचे आदेश दिले आहेत. फाशीची शिक्षा सुनावण्यात



आलेला दोषी नारायण चेतनराम चौधरी हा या गुन्ह्याच्या वेळी केवळ 12 वर्षांचा असल्याने त्याची तात्काळ सुटका करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिले. न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस, न्यायमूर्ती केएम जोसेफ आणि न्यायमूर्ती हृषिकेश रॉय यांच्या खंडपीठाने आरोपी हा गुन्ह्याच्या वेळी अल्पवयीन असल्याचा दावा योग्य असल्याचा निष्कर्ष काढल्यानंतर सोमवारी आरोपीला सोडण्याचे आदेश दिले.

नारायण चेतनराम चौधरी याने या प्रकरणात 28 वर्षे शिक्षा भोगली आहे. 1994 साली पुण्यातील राठी कुटुंबातील सात जणांची हत्या करण्यात आली होती. मृतांमध्ये दोन मुलं आणि एका गर्भवती स्त्रीचा समावेश होता. ...पान २ वर...

## ट्रक चालक चांगली वागणूक देत नसल्याने क्लीनरने काढला काटा; जालना जिल्ह्यातील घटना

किरकोळ कारणावरून होणाऱ्या वादाच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या असून, याच वादातून थेट जीवघेण्यापर्यंतच्या घटना देखील समोर येत आहे. दरम्यान जालना जिल्ह्यात (J a l n a District) अशीच काही घटना समोर आली आहे. चांगली वागणूक देत नाही म्हणून जबर



मारहाण करून ट्रकचालकाचा क्लीनरने खून केला आहे. हत्या (Murder) करून फरार झालेल्या या क्लीनरला गोंदी पोलिसांनी इंदोर येथून रविवारी ताब्यात घेतले आहे. विनोद रावत ( वय 32 वर्षे, रा. इंदोर, मध्य प्रदेश) असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव असून, सीताराम अमरसिंग निंगवाल (वय 45 वर्षे, रा. कानपूर, जि. धार, कर्नाटक) असे मयत ट्रक चालकाचे नाव आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ट्रकचालक सीताराम निंगवाल हे क्लिनर विनोद रावतसोबत कर्नाटकहून इंदोरकडे माल घेऊन निघाले होते. दरम्यान छत्रपती संभाजीनगर-बीड राष्ट्रीय महामार्गा वरील दोदडगाव फाट्याजवळ विनोद रावतने सीताराम

## भावजयीची छेड काढली म्हणून पीकअपने चिरडून केली हत्या; अपघाताच केला बनाव




बीडच्या (Beed) परळी शहरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. भावजयीची छेड काढली म्हणून पीकअपने चिरडून केली हत्या (Murder) करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे कोणालाही संशय येऊ नयेत म्हणून आरोपीने अपघाताचा (Accident) बनाव केला होता. मात्र पोलिसांना संशय आल्याने त्यांनी तापसाचे चक्र फिरवली आणि सर्व प्रकार उघडकीस आला. शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावर हा अपघात झाला होता. तर अपघाताचा बनाव करून हत्या करणाऱ्या आरोपीचे नाव राम बाबू पारवे (रा. डाबी, ता. परळी) आहे. तर संपत्ती भारत पारवे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. परळी शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावर मोटरसायकल व पीकअप वाहनाचा शनिवारी अपघात झाला होता. या अपघातात एकाचा मृत्यू तर एक जखमी झाला होता. मात्र याबाबत पोलिसांना शंका आली आणि त्यांनी तपासाचे चक्र फिरवली. दरम्यान पोलिसांनी ...पान २ वर...

## IIT मुंबईचा विद्यार्थी दर्शन सोलंकीची सुसाइड नोट पोलिसांच्या हाती; महत्त्वाची माहिती आली समोर

दर्शन सोळंकी आत्महत्या प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. या आत्महत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या विशेष चौकशी पथकाला दर्शन सोलंकीची सुसाइड नोट सापडली आहे. यामध्ये दर्शनने या पत्रात एका विद्यार्थ्या चेनाव घेतले असून त्याने मानसिक त्रास आणि धमकावले असल्याचा आरोप केला आहे. मागील महिन्यात आयआयटी मुंबईतील विद्यार्थी दर्शन सोलंकीने आत्महत्या केली होती. ही आत्महत्या जातीय भेदभावामुळे होत असल्याचा आरोप आयआयटीतील




विद्यार्थी संघटनांनी आणि इतर सामाजिक संघटनांनी केला होता. त्यानंतर आयआयटीने एक समिती स्थापन केली होती. तर, सामाजिक संघटनांच्या दबावानंतर मुंबई पोलिसांनी या प्रकरणातील गांभीर्य लक्षात घेता एक सह पोलीस आयुक्त लखमी गौतम यांच्या नेतृत्वात ही एसआयटी स्थापन केली होती. त्यानंतर या आत्महत्या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास करणाऱ्या मुंबई पोलिसांच्या पथकाला दर्शन सोलंकीची सुसाइड नोट मिळाली आहे. दर्शनने आत्महत्या करण्यामागे जातीवाचक टिप्पणीदेखील कारणीभूत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या सुसाइड नोटमध्ये दर्शनने एका विद्यार्थ्या चे नाव लिहिले असून त्याच्याकडून मानसिक छळ आणि धमकी दिली जात असल्याचे म्हटले आहे. मुंबई पोलिसांच्या एसआयटीला मिळालेल्या या सुसाइड नोटमुळे आता दर्शन सोलंकी ...पान २ वर...

## विधीमंडळ अधिवेशनात सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देणारे निर्णय-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई, विधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात सर्वसामान्यांना न्याय देणारे आणि सर्व घटकांना सामावून घेणारे असे निर्णय घेण्यात आले. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, महिला आणि युवा वर्गा च्या हिताचे अनेक निर्णय घेतले. खऱ्या अर्था नेकामकाजाच्या दृष्टीने हे अधिवेशन विक्रमी ठरले, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.विधीमंडळ अधिवेशन संपल्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत बोलताना ही माहितीदिली. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, या अधिवेशनामध्ये विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सर्व सामान्यांच्या प्रश्नांवर चर्चा झाली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना 350 रूपये हेक्टरी अनुदान जाहीर करण्यात आले. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महिलांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. लेक लाडकी योजना, राज्याचे नवे आधुनिक महिला धोरण, नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे आदी विषयांबाबत राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घेतली. महिलांना एस टी बस प्रवासात 50 टक्के सवलतीचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अधिवेशन कालावधीत झालेल्या कामकाजाची माहिती देताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, या अर्थ संकल्पीय अधिवेशनात दोन्ही सभागृहात मिळून 17 विधेयके संमत करण्यात आली. विधान परिषदेत 01 विधेयक प्रलंबित राहिले.

संयुक्त समितीकडे एक विधेयक पाठविण्यात आले तर एक विधेयक मागे घेण्यात आले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आमचा भर विधीमंडळात जास्तीत जास्त




कामकाज होण्यावर होता. राज्याला विकासाकडे घेवून जाणारा अर्थसंकल्प आम्ही सादर केला. विविध समाज घटकांना दिलासा देणारे निर्णय घेतले. सर्वांसाठी घरे ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी गृहनिर्मा ण याशिवाय विविध आवास योजनांच्या माध्यमातून घरे उपलब्ध करून देण्याचा संकल्प आपण केला आहे. विविध विषयांवरील चर्चेत राज्य शासनाने सकारात्मक भूमिका घेतली. लोकहिताचे निर्णय घेण्यात राज्य शासनाला यश आल्याचे त्यांनी सांगितले.

**विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात संमत झालेली विधेयके खालीलप्रमाणे :**

1) महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, 2023 (वित्त विभाग)

(2) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधीकरण विधेयक, 2023. (वैद्यकीय शिक्षण विभाग)

(3) मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2023 (नामनिर्देशित सदस्यांच्या संख्येत वाढ करण्याबाबत) (नगर विकास विभाग)

(4) महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2023 (शिक्षेच्या तरतूदीमध्ये बदल करणेबाबत) (ग्राम विकास विभाग)

(5) महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, 2023 (सामान्य प्रशासन विभाग)

(6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2023 (विद्यापीठांचे कुलगुरू नियक्ती करण्याच्या व प्र. कुलगुरूची नियुक्ती करण्याच्या पात्रता निकषांची व निवड समिती गठित करण्याची तरतूदी विद्यापीठ...पान २ वर...

पोलीस
बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र
मुंबई
मुंबई, मंगळवार २८ मार्च ते ०३ एप्रिल - २०२३


# शौचाला न होणे हेसुद्धा असू शकते कोलन कॅन्सरचे लक्षण; शरीराचे हे 5 संकेत पहिल्याच टप्प्यावर ओळखा




कोलन कर्करोग हा कर्करोगाचा एक प्रकार आहे जो मोठ्या आतड्यात (कोलन) आणि गुदाशयात विकसित होतो. हा प्राणघातक असू शकतो. आरोग्यतज्ज्ञांच्या माहितीनुसार, सुरुवातीच्या टप्प्यावर या कर्करोगाचे निदान झाल्यास तो बरा होण्याची शक्यता आहे. इतर आजार, किंबहुना कॅन्सरच्या अन्य प्रकारांपेक्षाही कोलन कर्करोगाची लक्षणे अत्यंत सामान्य असतात, त्यामुळे साहजिकच ती ओळखता येणे शक्य होत नाही. यामुळेच उपचाराला उशीर होऊन आव्हाने वाढू शकतात. आज आपण आरोग्यतज्ज्ञांच्या माहितीनुसार कोलन कर्करोगाची काही लक्षणे जाणून घेणार आहोत...

कोलन कर्करोगाची लक्षणे (Colon Cancer Signs)

१) डॉ. स्नीता सिनुकुमार, सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, मणिपाल हॉस्पिटल, पुणे यांनी टाइम्सला दिलेल्या माहितीनुसार पचन व शौचाच्या सवयींमध्ये बदल जाणवणे खूप सामान्य आहे. पण, जर हे वारंवार होत असेल; म्हणजेच सतत अतिसार, बद्धकोष्ठता किंवा विष्ठेच्या सुसंगततेत बदल होत असेल तर ते कोलन कर्करोगाचे लक्षण असू शकते.

२) अनपेक्षितपणे वजन झपाट्याने कमी होणे हेसुद्धा कोलन कॅन्सरसह अनेक रोगांचे लक्षण असू शकते. आहार किंवा व्यायामाच्या दिनचर्येत बदल न करता जर एखाद्या व्यक्तीचे वजन लक्षणीय प्रमाणात कमी झाले असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

३) सतत ओटीपोटात दुखणे, पेटके येणे किंवा अस्वस्थता हे कोलन कर्करोगासह अनेक परिस्थितींचे लक्षण असू शकते.

४) विष्ठेमध्ये रक्त दिसणे हे मुख्यतः मूळव्याध किंवा त्वचारोगाचेसुद्धा लक्षण असू शकते, पण या शक्यता वगळल्यासही हा त्रास होत असल्यास डॉक्टरांना भेट देणे आवश्यक असते.

५) थकवा किंवा अशक्तपणा जाणवणे हे कोलन कॅन्सरसह अनेक आजारांचे लक्षण असू शकते. आळशीपणा आणि अशक्तपणा सतत जाणवत असल्यास व इच्छा असूनही काम करायची इच्छा होत नसल्यास एकदा डॉक्टरांशी चर्चा करणे उत्तम ठरेल. हे लक्षात घ्या की, यांपैकी बरीच लक्षणे इतर परिस्थितींमुळेदेखील होऊ शकतात आणि कोलन कर्करोग असलेल्या प्रत्येकाला त्या अनुभवास येत नाहीत. पण, यांपैकी कोणत्याही लक्षणांचा आपल्याला वारंवार त्रास होत असल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## मेष — मानसिक अस्थिरता जाणवेल

किरकोळ कारणावरून मानसिक अस्थिरता जाणवू लागेल. काही मानसिक तणावाचे प्रसंगही अनुभवास येतील. विचलित न होता ध्येयापासून बाजूला जाऊ नका. धार्मिक कार्याचा आनंद मिळेल. अचानक प्रवासाचे योग संभवतात. प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. नवे परिचय लाभदायक ठरतील. प्रकृतीची पथ्ये पाळा.

**शुभ दिनांक** २८, २९, ३०.

## वृषभ — चांगल्या गोष्टीतून पुढे जाल

सप्ताह मिश्र फलदायी आहे. हितचिंतक व हितशत्रू यांना समान अंतरावरून हाताळावे लागेल. चांगल्या गोष्टींतून पुढे जाता येईल. व्यवसायात वाढणारा ग्राहकवर्ग आणि मिळणारी जास्तीची आवक यातून कौशल्य पणाला लागेल. त्यातून स्वत:ला चांगल्या अर्थाने सिद्ध करू शकाल. जुन्या आरोग्याच्या तक्रारीतून मुक्तता होईल.

**शुभ दिनांक** २६, २७, २९, ३०.

## मिथुन — यशाबद्दल अपेक्षा नकोत

यशाबद्दलच्या अपेक्षा ठेवणे योग्य नाही. ज्येष्ठांच्या नाराजीचे पडसाद मनाला विचलित करू शकतात. कौटुंबिक समस्या, नाराजीचे प्रसंग उद्भवू शकतात पण चिंता करण्याचे कारण नाही. प्रवासाचे योग. वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवा, व्यवहारात सतर्क राहा. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. कायदा व नियमांचे पालन करा.

**शुभ दिनांक** २८, २९, ३०.

## कर्क — उशिराचे निर्णय नुकसानकारक

पारंपरिक व्यवसाय, व्यावसायिक, इ.ना या सप्ताहात यश मिळू शकेल. नोकरदारांना चांगल्या मोठ्या संधीची चाहूल लागेल. वैवाहिक व कौटुंबिक जीवनातही चांगल्या घटनांची नोंद होत राहील. काही बाबतींत उशिरा घेतलेले निर्णय नुकसानकारक ठरू शकतात. वैवाहिक व कौटुंबिक जीवनात शक्य त्या मर्यादा पाळा.

**शुभ दिनांक** २६, २७, ३१, १.

## सिंह — नव्या संधी येतील

सप्ताह आपल्यासाठी संमिश्र स्वरूपाचा ठरेल. चांगले बदल घडतील. होत असलेल्या नुकसानीवर चांगली मात करता येईल. आपले नेमके लक्ष्य गाठण्यासाठी अनेकांचे सहकार्य मिळेल. गुंतवणुकीच्या नव्या संधी समोर चालून येतील. व्यापार असो, व्यवसाय असो किंवा नोकरी असो आपल्याला प्रगतीकडे वाटचाल करता येईल. आर्थिकदृष्ट्याही सप्ताह सक्षम करणारा ठरेल.

**शुभ दिनांक** २६, २७, २८, २९, ३०.

## कन्या — आळसाला थारा नको

राशीकडून चांगल्या परिणामांची अपेक्षा आहे. आपली प्रगती ही काही जणांना विस्मयकारक वाटू शकते, तर काहीजण हेवाही करतील. स्वत:चा अभ्यास, कष्ट करण्याची तयारी, नेमक्या वेळी मिळणारे नशिबाचे दान आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यांचा सुयोग्य मेळ बसत राहील. आळस, चालढकल या गोष्टींना सध्या थारा देऊ नका.

**शुभ दिनांक** २८, २९, ३०, ३१, १.

## तूळ — गप्प बसणे उत्तम

अनिष्ट ग्रहांच्या तीव्र प्रतिसादाने प्रत्येक कार्यात माघार घ्यावी लागते. प्रश्न उपस्थित होतात. अशा काळात कमी बोलणे, गप्प बसणे हा उत्तम मार्ग राहतो. नाराजी पत्करू नका. काही चांगल्या, सुखद गोष्टींच्या वार्ताही ऐकण्यास मिळतील. कलाक्षेत्रात छान प्रावीण्य मिळवू शकाल. प्रवासाचे योग येतील. प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळू शकेल. प्रकृतीची पथ्ये पाळण्यास विसरू नका.

**शुभ दिनांक** ३१, १.

## वृश्चिक — बोलण्यावर नियंत्रण ठेवा

परिश्रमाने कार्यभाग साधणे शक्य. परंतु यश सहजपणे मिळविता येणार नाही. महत्त्वाच्या कामात जपून पावले टाकावी लागतील. कार्यात सावधानता, गुप्तता ठेवावी लागेल. कौशल्याचा लाभ घेऊन आर्थिक बाब चांगली ठेवता येईल. व्यवहारात सावधानता बाळगा. प्रकृतीची पथ्ये पाळा. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा.

**शुभ दिनांक** २६, २७.

## धनु — शुभ घटनांची नांदी

आनंदाने आणि प्रेमाने सगळ्यांशी वागून अपेक्षित साध्य गाठत पुढे चला. जोरजबरदस्ती करू नका. आनंदाचे क्षण आपल्या वाट्याला येत राहतील. आर्थिकदृष्ट्या सप्ताह मोठी झेप घ्यायला मदत करेल. त्यातून अनेक मोठी उद्दिष्टे पूर्ण करता येतील. वैवाहिक व कौटुंबिक जीवनातही अशाच शुभ घटनांची नोंद होत राहील.

**शुभ दिनांक** २६, २७, २८, २९, ३०.

## मकर — संधी अचूकपणे टिपा

ग्रहांची मांदियाळी आपल्यासाठी लक्ष लक्ष शुभेच्छा घेऊन येणारी ठरणार आहे. कला, साहित्य, विज्ञान, तंत्रज्ञान, शेती, न्याय, संशोधन अशा विविध क्षेत्रांतून वेगळी ओळख निर्माण करता येईल. नव्या मिळणाऱ्या संधी अचूकपणे टिपा. मिळणारे सहकार्य वेळीच पदरात घ्या. कष्टाळू स्वभावाला चांगले परिणाम मिळणार आहेत.

**शुभ दिनांक** २८, २९, ३०, ३१, १.

## कुंभ — कार्याची गती

महत्त्वाच्या ग्रहांची प्रतिकूलता असताना येणारे प्रश्न आणि अडथळे यामुळे दैनिक व्यवहारातील कार्याची गती मंद होते. याचा अनुभव येणार आहे. प्रत्येक कार्यात सतर्क व सावध राहूनच पुढचे पाऊल टाकावे लागणार आहे. आपले अधिकार, उपक्रमांना यशाचे वलय प्राप्त होण्यासाठी वरिष्ठांकडून मिळणाऱ्या कार्यशक्तीचा उपयोग करता येईल. कला, राजकारण, व्यापार क्षेत्राला चालना देता येईल.

**शुभ दिनांक** ३१, १.

## मीन — कोणावरही विश्वास टाकू नका

महत्त्वाच्या ग्रहांची प्रतिकूलता असणार आहे त्यामुळे सहजपणे यश मिळणे कठीण. परिश्रम आणि योग्य प्रयत्नांची जोड देऊन आपण कार्यभाग साधू शकाल व आपली प्रतिष्ठाही शाबूत ठेवू शकाल. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिक व्यवहारात फाजील विश्वास कोणावरही टाकू नका. आपले वरिष्ठ, भागीदार, सहकारी यांची नाराजी राहणार नाही याची दक्षता घ्या.

**शुभ दिनांक** २६, २७.

## भावजयीची छेड काढली म्हणून पीकअपने

केलेल्या अचूक तपासानंतर हा अपघात नसून हत्या असल्याचे तपासात समोर आले. तर तीन महिन्यांपूर्वी भावजईचा हात धरून छेडछाड केल्याचा मनात राग होता, आणि त्याचाच बदला घेण्यासाठी राम पारवे याने अपघात घडवून आणल्याचे तपासात समोर आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जवळपास तीन महिन्यांपूर्वी, संपत्ती भारत पारवे याने आरोपी राम पारवे याच्या भावजईच्या हाताला धरून छेड काढली होती. याचा राग आरोपी राम पारवे याच्या मनात होता. त्यामुळे संपत्ती पारवेचा गेम करण्याचा त्याने ठरवले होते. दरम्यान 25 मार्च रोजी संपत्ती पारवे व त्याचा मित्र निकम केरबा एंगडे हे दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास परळीकडून नागापूरकडे जात असताना त्यांच्या मोटारसायकलला पाठीमागून येणाऱ्या पीकअपने जोराची धडक दिली होती. संपत्ती हा खाली पडला असता त्याच्या अंगावरून पुन्हा पीकअप घालून त्याला राम पारवने ठार मारले होते. मात्र त्यानंतर अपघाताचा बनाव केला होता. मात्र पोलिसांनी केलेल्या तपासात त्याचे बिंग फुटले. पोलिसांना संशय आला आणि बिंग फुटलं परळी शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावर मोटरसायकल व पीकअप वाहनाचा शनिवारी अपघात झाला होता. या अपघातात एकाचा मृत्यू तर एक जखमी झाला होता. दरम्यान घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मात्र संभाजीनगर ठाण्याचे पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनेची परिस्थिती पाहून हा अपघात नव्हे तर खूनच असल्याचा संशय व्यक्त केला. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळीची पाहणी केली. पुढे हा खूनच असल्याचे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले. पोलिसांनी केवळ एका तासातच आरोपी राम पारवेला बेड्या घेऊन ताब्यात घेतले.

## भूमाफियाने खोदलेल्या खड्ड्यात पडून

करण्यात येत आहे. पालिका अधिकारीही घटनेला जबाबदार : घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी रेहानचा मृतदेह खड्ड्यातून बाहेर काढला होता. हा खड्डा खोदणाऱ्या भूमाफियांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी गेल्या दोन दिवसांपासून नागरिकांकडून केली जात आहे. तर दुसरीकडे कल्याण डोंबिवली महापालिका अधिकारीही या घटनेला तितकेच जबाबदार आहेत, असा आरोपही नागरिकांनी केला. खळबळजनक बाब म्हणजे, गेल्या आठवड्यात अंबरनाथ तालुक्यातील नेवाळी जवळ रस्ते कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात पडून दोन मुलांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी दोन दिवसांनी हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. आणखी एका मुलाचा मृत्यू : विशेष म्हणजे, या घटनेच्या दिवशी नेवाळी परिसरातील नागरिकांनी गुन्हा दाखल करण्यासाठी 'रस्ता रोको आंदोलन' केले होते. त्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही घटना ताजी असतानाच कल्याण पूर्वेत आणखी एका मुलाचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही घटनांमुळे ठेकेदार, बेकायदा बांधकाम करणारे भूमाफिया यांच्या निष्काळजीपणामुळे तिन्ही बालकांचे बळी गेल्याची टीका नागरिक करीत आहेत. रेहानच्या मृत्यू प्रकरणी तपास सुरू आहे. वस्तुस्थितीच्या आधारे कारवाई करण्यात येईल, असे कोळसेवाडी पोलीस ठाण्यातील तपासी अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

## पुण्यातील 1994 सालच्या राठी हत्याकांडातील

हा खटला सुरू असताना आरोपी नारायण चेतनराम चौधरी याचं वय 20 ते 22 असल्याचं नोंद करण्यात आलं होतं. त्या खटल्यात आरोपी चौधरी आणि त्याच्या दोन साथिदारांपैकी एक साथिदार जितेंद्र गेहलोत याने राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज केला होता. जितेंद्र गेहलोतची फाशीची शिक्षा ही जन्मठेपेत बदलण्यात आली. नारायण चौधरीने आपला दयेचा अर्ज मागे घेतला आणि गुन्हा घडला त्यावेळी आपण अल्पवयीन होतो असं सांगत एक पुनर्विचार याचिका दाखल केली.

## विधीमंडळ अधिवेशनात सर्वसामान्यांच्या

अनुदान आयोगाच्या विनियमांशी अनुरूप करण्याकरिता सुधारणा करणे) (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(7) महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, 2022 (शिक्षेच्या तरतूदीमध्ये बदल करणेबाबत) (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग)

(8) महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, 2023. (वित्त विभाग)

(9) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोक-या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, 2023. (वित्त विभाग)

(10) पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, 2023 (विधि व न्याय विभाग)

(11) महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2023 (वित्त विभाग)

(12) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क नियमन) (सुधारणा)

(13) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, 2023 (विविध कलमांमध्ये सुधारणा करण्याबाबत) (नगर विकास विभाग)

(14) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, 2023 (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

(15) महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, 2023

(16) महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, 2023. (विशेष पोलीस आयुक्त या पदाच्या संदर्भा चासमावेश करण्यासाठी वैधानिक तरतुद करणे) (गृह विभाग)

(17) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, 2023 (कोविड-19 वैश्विक साथरोग राहिलेला नसल्याने त्या अनुषंगाने कलम 73अअ मध्ये केलेली सुधारणा वगळणेबाबत.) (सहकार, वस्त्रद्योग व पणन विभाग)

विधान परिषदेत प्रलंबित विधेयक

(1) स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, 2022 (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

संयुक्त समितीकडे विधेयके

(1) महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, 2022 (सामान्य प्रशासन विभाग))

## अदानी-मोदी नवा अंक सरू

जाण्याचा अधिकार आहे. न्यायालयात पीडितांना वकिलांमार्फत त्यांच्या बाजूने बोलण्याची संधीही देण्यात आली. न्यायालयाने राहुल गांधी माफी मागणार का, असे विचारले, पण त्यांनी नकार दिल्यामुळे त्यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. याशिवाय राहुल गांधींवर मानहानीचे अजून सात खटले सुरू आहेत, असेही रविशंकर प्रसाद यांनी सांगितले. अदानी आणि मोदी यांचे नाते नवे नाही-राहुल गांधी उद्योगपती गौतम अदानी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाते काही नवीन नाही, असा टोला काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी सत्ताधारी भाजपला लगावला.खासदारकी गेल्यानंतर राहुल गांधी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेतून त्यांची भूमिका स्पष्ट केली. खासदारकी गेली असली तरीही राहुल गांधी यांनी भारताच्या लोकशाहीसाठी लढत राहणार असल्याचा निर्धा र केला आहे. मी कोणालाही घाबरत नाही. मी भारताच्या लोकशाहीसाठी लढत राहणार, प्रश्न विचारत राहणार, असे राहुल गांधी म्हणाले. ते म्हणाले की, मी तुमच्याशी खूप वेळा बोललो आहे की भारतात लोकशाहीवर आक्रमण होत आहे. याची रोज नवनवी उदाहरणे मिळत आहेत. मी एकच प्रश्न विचारला होता. अदानींची शेल कंपनी आहे. त्यात २० हजार कोटी रुपये कोणीतरी गुंतवले. हा अदानींचा पैसा नाही. अदानींचा इन्फ्रास्ट्रक्चर व्यवसाय आहे. मग हे पैसे कोणाचे आहेत, असा प्रश्न मी विचारला होता. राहुल गांधी बोलले होते की सर्व मोदी आडनाववाले चोर आहेत. मोदी आडनाववाले बिहार, भारत, पश्चिम भारत आणि मागासलेल्या भागातून येतात. राहुल गांधींनी केलेल्या विधानामुळे या मागासवर्गीय लोकांचा अपमान झाला होता. राहुल गांधींना भरसभेत त्यांच्यावर टीका करण्याचा अधिकार आहे, पण अपशब्द वापरण्याचा अधिकार नाही. राहुल गांधींना अपशब्द वापरण्याचा अधिकार असेल तर पीडितांना न्यायालयात जाण्याचा अधिकार आहे. न्यायालयात पीडितांना वकिलांमार्फत त्यांच्या बाजूने बोलण्याची संधीही दिली. न्यायालयाने राहुल गांधी माफी मागणार का, असे विचारले, पण त्यांनी नकार दिल्यामुळे त्यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. याशिवाय राहुल गांधींवर मानहानीचे सात खटले सुरू आहेत, असेही रविशंकर प्रसाद म्हणाले. राहुल गांधी देशद्रोहीच-शिंदेपंतप्रधान नरेंद्र मोदींवर बोलण्याचा राहुल गांधींना अजिबात अधिकार नाही. राहुल गांधी यांनी मोदी आडनावावर बोलून सबंध ओबीसी समाजाचा अवमान केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी १२ महिने आणि २४ तास काम करीत आहेत. दुसरीकडे राहुल गांधी देशाबाहेर जाऊन देशाचा अपमान करीत आहेत. हाच मुळात देशद्रोह आहे. राहुल गांधी यांनी सावरकरांचा सातत्याने अपमान केला. सावरकर हे महाराष्ट्राचे नाही तर देशाचे दैवत आहे. राहुल गांधी यांनी एक दिवस सेल्युलर जेलमध्ये राहून दाखवावे. त्यांना एक तास घाण्याला जुंपले तर त्यांना यातना समजतील. त्यामुळे त्यांचा निषेध करायचा तेवढा थोडाच आहे. राहुल यांनी पंतप्रधान मोदी यांचाही अपमान केला आहे.

## ट्रक चालक चांगली वागणूक देत नसल्याने

निंगवाल यांच्या डोक्यावर व चेहऱ्यावर पान्याने वार करून खून केला. नंतर तो तेथून फरार झाला. कंपनीच्या लोकांनी सीताराम निंगवाल यांच्याशी संपर्क केला असता, संपर्क होऊ शकला नाही. त्यांनी ट्रकचा शोध घेतला असता, ट्रॅकमध्ये सीताराम निंगवाल यांचा मृतदेह बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास आढळून आला होता. याची माहिती गोंदी पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून आरोपीचा शोध सुरु केला होता. इंदोर येथून पोलिसांनी घेतलं ताब्यात याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरु केला असता, क्लिनर विनोद रावतनेच सीताराम निंगवाल यांची हत्या केली असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. त्यामुळे पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला. पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास करत त्याचा शोध घेतला असता तो इंदोरमध्ये असल्याचे समोर आले. त्यामुळे पोलिसांच्या एका पथकाने अखेर त्याला रविवारी इंदोर येथून ताब्यात घेतले आहे. तर ट्रक चालक सीताराम निंगवाल हे चांगली वागणूक देत नसल्यामुळे हा खून केल्याची कबुली त्याने गोंदी पोलिसांना दिली आहे. यांनी केली कारवाई... ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. अक्षय शिंदे, अपर - पोलिस अधीक्षक राहुल खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीवायएसपी संदीप पाटील, सहायक पोलिस निरीक्षक सुभाष सानप, पीएसआय गणेश राऊत, पोलिस कॉन्स्टेबल करंडे, कोलगुडे यांनी केली आहे.

## कारवर पोलीस नावाचं स्टीकर अन् अंबर दिवाही,

ते वापरायचे, असा प्रकार तो करीत असल्याचा संशय पोलिसांना आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने 26 मार्च रोजी भीमवाडी, सुंदरवाडी परिसरात कारवाई केली असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दिली आहे. पोलिसांनी लावला सापळा... शहरातील चिकलठाणा येथील मिनी घाटी परिसरातून 25 मार्चला एक स्कॉर्पिओ चोरीला गेली होती. दरम्यान पोलिसांकडून या चोरीच्या गाडीचा शोध सुरु असतानाच, ती बीड बायपास परिसरातील भीमवाडी सुंदरवाडी येथे उभी असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण वाघ यांना मिळाली होती. त्यामुळे त्यांनी सहायक उपनिरीक्षक सतीश जाधव, अंमलदार योगेश नवसारे, विजय घुगे, नितीन देशमुख, काकासाहेब आधाने, तातेराव शिनगारे, ज्ञानेश्वर पवार, अश्वलिंग होनराव यांच्यासह सापळा लावला. कारमध्ये अंबर दिवा, लोखंडी पिस्टल आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी सापळा लावून लक्ष ठेवून होते. दरम्यान याचवेळी संजय ऊर्फ मदन पोपळघट हा तेथे आला. आधीच दबा धरून बसलेल्या पोलिसांनी तत्काळ त्याला पकडले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, कारची झडती घेतली असता त्यात पाठीमागे पोलिस असे स्टिकर लावलेले दिसले. समोर पोलिस अधिकाऱ्याची कॅप ठेवलेली होती. कारमध्ये अंबर दिवा, लोखंडी पिस्टल आढळून आली आहे. चोरीच्या वाहनाबाबत कोणालाही संशय येऊ नये म्हणून त्याने पोलिस नावाचा वापर केल्याचे सांगितले जाते. दरम्यान, तो ज्या दुचाकीवरून कारजवळ आला, त्या दुचाकीवरही पाठीमागे पोलिस लिहिलेले होते. यावरून तो पोलिस नावाचा वापर करून चोरीची वाहने लपवत असल्याचा संशय बळावला आहे.

## नागपूरच्या तीन सराईत गुन्हेगारांना अटक

पोलीस दफ्तरी नोंद आहे.रामनगर पोलीसांना सक्करदरा येथील तीन सराईत दखलपात्र गुन्हा करण्यासाठी आल्याचा सुगावा लागला. जुना पाणी चौकात नाकाबंदी करण्यात आली. तेव्हा या रस्त्यावर एक काळया रंगाची कार येताना दिसली. तपासणी केल्यावर त्यात तिघे आढळून आले. त्यांना विचारपूस केल्यावर ते हडबडले. याच कारमध्ये मोठा दारू साठा तसेच शस्त्रे आढळून आली. तिघांनाही अटक करण्यात आली आहे.तसेच पाच लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या तिघांची कसून चौकशी सुरू असून ते कोणता गुन्हा करण्यासाठी वर्धेत आल्याबाबत तपासणी होत आहे.

## ट्रॉलीचा धक्का लागल्याच्या वादातून

लागला. यावरून दोघात वाद झाला. यात आरोपी मोहम्मद हनीफ याने कंपनीतील शफाउद्दीनला जोरात मारले. या हल्ल्यात गंभीर जखमी होऊन शफाउद्दीन ठार झाला. नंतर आरोपी मोहम्मद हनीफ हा घटनास्थळावरुन फरार झाला होता.

रेल्वे स्थानकातून अटक : दरम्यान, भिवंडी तालुका पोलिसांचे पथक कंपनीत दाखल झाले. त्यांनी पंचनामा करत मृतदेह उत्तरणीय तपासणीसाठी भिवंडीतील स्वर्गीय इंदिरा गांधी रुग्णालयात रवाना केला. नंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोराटे , सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण मतकर , पोलीस नाईक जयवंत मोरे, बाळा जाधव, केदार, मुकादम , वाळींबे या पोलीस पथकाला खबर लागली कि, आरोपी हा उत्तरप्रदेश मध्ये पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच, पोलीस पथकाने कल्याण रेल्वे स्थानकात सापळा रचून आरोपीला अटक केली. सोमवारी आरोपीला न्यायालयात हजर केले असता त्याला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण मतकर करत आहेत.

## IIT मुंबईचा विद्यार्थी दर्शन सोलंकीची सुसाइड नोट

आत्महत्या प्रकरणाला मोठे वळण मिळण्याची शक्यता आहे.

आयआयटीच्या समितीने नाकारले होते आरोप दर्शन सोळंकी आत्महत्या प्रकरणात मुंबई आयआयटीने स्थापन केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला होता. या अहवालात समितीने दर्शन सोळंकी आत्महत्या प्रकरणात जातीभेद केला जात असल्याचा आरोप पूर्णपणे नाकारला आहे. शैक्षणिक कामगिरी हे त्याच्या आत्महत्या करण्यामागचं कारण असल्याची शक्यता मुंबई आयआयटीने स्थापन केलेल्या समितीच्या अहवालात नमूद केले होते.

दर्शन सोळंकी आत्महत्या प्रकरण काय? दर्शन सोळंकी (वय 18 वर्षे) या विद्यार्थी मुंबई आयआयटीमध्ये केमिकल इंजिनीअरिंगच्या पहिल्या वर्षा तशिकत होता. त्याने 12 फेब्रुवारी रोजी कॅम्पसमधल्या हॉस्टेलच्या सातव्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली होती. दर्शन हा मूळचा अहमदाबादचा (Ahmedabad) असून तो तीन महिन्यांपूर्वीच शिक्षणासाठी आयआयटी मुंबईत आला होता. 11 फेब्रुवारी रोजी त्याची परीक्षा झाली होती. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे 12 फेब्रुवारी त्याने हे टोकाचं पाऊल उचललं.

दर्शन सोलंकीच्या आत्महत्येनंतर आयआयटी मुंबईतील 'दस्तक', आंबेडकर पेरियार स्टडी सर्कल आणि इतर संघटनांनीदेखील जातीय भेदभावातून आत्महत्या झाली असल्याचा दावा केला होता. तर, या प्रकरणातील दोषींवर कारवाई करावी या मागणीसाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, जाती अंत संघर्ष समिती, जनवादी महिला संघटना, डीवायएफआयसह डाव्या संघटनांनी आयआयटी मुंबईबाहेर आंदोलन केले होते.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार २८ मार्च ते ०३ एप्रिल - २०२३

संपादकीय...



# कळ्यांचे नि:श्वास!

वयाचे अठरावे वर्ष गाठण्याआधीच गेल्या तीन वर्षांत १५ हजार मुली माता झाल्या, ही आकडेवारी बालविवाहांचेही वास्तव उघड करते..

महाराष्ट्राच्या आदिवासी भागात बालविवाहांचे प्रमाण वाढल्यामुळे अल्पवयीन मातांची संख्या गेल्या तीन वर्षांत १५ हजार २६३ असल्याची माहिती खुद्द महिला व बालविकासमंत्र्यांनीच विधानसभेत दिली असून ती धक्कादायक आहे. अस्वस्थ करणारी बाब म्हणजे ही आकडेवारी केवळ बालविवाहांची नसून १५ ते १८ या वयात माता झालेल्या मुलींची आहे. ही उघड झालेली आकडेवारी असेल तर अशा उघडच होऊ न शकलेल्या घटना किती असतील? ही तर आदिवासी भागामधली आकडेवारी असे म्हणून कोणत्याच घटकाला त्यापासून पळ काढता येणार नाही. कारण त्याव्यतिरिक्त ग्रामीण भागातच नाही, तर अगदी शहरी भागातही बालविवाह होत नाहीत, असे कुणीच छातीठोकपणे सांगू शकणार नाही. आपल्याकडे २००६ साली बालविवाह प्रतिबंध कायदा झालेला असला तरी त्यानंतरही आपल्या समाजात बालविवाह होतात, हे अगदी ढळढळीत सत्य आहे आणि ते नाकारण्यात काहीच हशील नाही. पण आत्ता पुढे आलेल्या आकडेवारीला वेगळा संदर्भ आहे. तो आहे करोनाकहराचा. बरोबर तीन वर्षांपूर्वी याच महिन्यात भारतातही पसरू लागलेल्या करोनाच्या महासाथीने जगभरात ज्या काही उलथापालथी घडवल्या त्याचे सामाजिक परिणाम अद्यापही समजून घेतले जात आहेत. वाढलेले बालविवाह हा त्यातलाच एक परिणाम असू शकतो. मुलींना घरात ठेवण्याची जोखीम घेण्यापेक्षा त्यांचा विवाह लावून देण्याचा पर्याय या काळात निवडला गेलेला असू शकतो. मुलींचे लग्नाचे कायदेशीर वय १८ वरून २१ वर नेण्याची चर्चा सुरू असताना लहान वयातच त्यांचे हात पिवळे करून त्यांच्यावर मातृत्व लादले जाण्यात वाढ होणे हे व्यक्ती म्हणून त्यांच्याच नाही तर एकूण समाजाच्या देखील अजिबातच हिताचे नाही.

आपल्याकडे सांप्रत काळात पुरुषांसाठी २१ तर स्त्रियांसाठी १८ हे विवाहाचे कायदेशीर वय आहे. त्याआधी केलेले सगळे विवाह हे बालविवाह आणि म्हणून बेकायदा ठरतात. अगदी त्या जोडप्याच्या संमतीने तो विवाह झाला असेल तरी तो ग्राह्य न धरता तो गुन्हाच मानला जातो. विवाहाचे वय कायद्याने निश्चित करण्याची संकल्पना आली ती ब्रिटिश काळात. ती पचवणे भारतीय मानसिकतेला तसे जडच गेले असणार कारण त्याआधी अगदी पाळण्यातदेखील विवाह ठरवले जात आणि उरकले जात. पण स्त्रियांना लहानपणीच येणारे वैधव्य रोखण्यासाठी हरविलास शारदा यांनी १९२९ मध्ये बालविवाहविरोधी विधेयक तत्कालीन केंद्रीय विधानसभेत मांडले आणि तिथून विवाहविषयक वयनिश्चितीची ठोस चर्चा सुरू झाली. या बालविवाह प्रतिबंधक कायद्याला शारदा कायदा असेही म्हणतात. या कायद्यानुसार मुलीचे लग्नाचे वय १४ तर मुलाचे १८ ठरवण्यात आले होते. पुढे १९७८ मध्ये या कायद्यात बदल होऊन ते अनुक्रमे १८ आणि २१ करण्यात आले. पण या दोन्ही कायद्यांमध्ये बालविवाह रोखण्याची वा शिक्षेची तरतूद नव्हती, ही त्यातील मुख्य त्रुटी होती. त्यामुळे त्यांची फारशी प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे मग २००६ साली आधीचे हे दोन्ही कायदे रद्द करण्यात आले आणि बालविवाह रोखणे, बालविवाहात गुंतलेल्या मुलांचे संरक्षण आणि गुन्हेगारांवर खटला चालवणे अशी उद्दिष्टे ठेवून बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ संमत करण्यात आला. आता या कायद्यानुसार बालविवाह हा अजामीनपात्र गुन्हा असून बालविवाहाची माहिती असणारी कोणीही व्यक्ती तो रोखण्यासाठी मनाई हुकूम मिळवू शकते. संबंधित व्यक्तींना दोन वर्षे तुरुंगवास किंवा लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

अशा सगळ्या तरतुदी करूनही बालविवाह रोखणे ही आपल्या समाजात किती मोठी समस्या आहे, हे आदिवासी समाजासंदर्भातील नुकत्याच पुढे आलेल्या आकडेवारीवरून लक्षात येते. आदिवासी भागात गेल्या तीन वर्षांत १५ हजारांच्या आसपास म्हणजेच वर्षाला पाच हजार; म्हणजेच दर दिवशी कुठे ना कुठे १२० ते १२५ अल्पवयीन मुली माता झाल्या आहेत. या आकडेवारीकडे डोळे उघडे ठेवून बघितले तर दिसणारे चित्र भयावह आहे. याचा अर्थ आदिवासी भागातील तेवढ्या मुली आणि कदाचित तेवढेच मुलगे शिक्षण प्रक्रियेतून कायमचे बाहेर फेकले गेले. रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये शिकण्याची मुलींची संधी काढून घेतली गेली. कौशल्याधारित रोजगाराच्या आजच्या काळात अशी माणसे फक्त शेतमजुरी, रोहयोतील कामे अशा कामांसाठी उरतात. या कामांना कमी लेखण्याचा हेतू इथे निश्चितच नाही, पण या मुलांच्या आईवडिलांनी तेच काम केले असेल आणि त्यांची मुलेही तेच करत राहणार असतील तर, ते जगण्याच्या प्रक्रियेच्या एक टप्पा वर कधी जाणार? दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून ते आणि त्यांच्या पुढच्या पिढ्या बाहेर कधी आणि कशा पडणार? मानवी आयुष्यातील अथांग शक्यतांशी त्यांचा कधी परिचयच होणार नसेल तर ते त्या धुंडाळणार कधी?

त्याहीपेक्षा मूलभूत मुद्दा आहे, या मुलांच्या अर्धविकसित शरीरांचा. निसर्ग त्याचे काम मानवी शरीराच्या १३-१४ व्या वर्षांपासून करू लागला असला तरी प्रजोत्पादनासाठी विशेषत: स्त्रीचे शरीर विकसित होण्यासाठी आणि पुढची पिढी निरोगी, सशक्त जन्माला येण्यासाठी आणखी काही वर्षे जायला हवीत, असे वैद्यकशास्त्र सांगते. स्त्रीचे लग्नाचे वय १८ ठरवण्यात आले, ते त्या दृष्टिकोनातून. २१ वर्षांच्या आतील पुरुषही लग्न, संसार, पालकत्व, आर्थिक जबाबदाऱ्या सगळ्यासाठी परिपक्व झालेला नसतो हे उघडच आहे. लैंगिक शिक्षण मिळण्याआधीच लैंगिक जीवनाला सुरुवात होणे हे किती भयावह असू शकते, याची कल्पनाच केलेली बरी. भातुकलीच्या खेळातून जेमतेम बाहेर पडून आपले पुढचे आयुष्य, ते सक्षम बनवायचे, त्यासाठी काय काय करायचे, याचा विचार करायचा, पुढील जीवनाची स्वप्ने बघण्याचा, महत्त्वाकांक्षा बाळगण्याचा, स्वप्ने बघण्याचा आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी धडपड करण्याचा हा महत्त्वाचा काळ. त्याआधीच त्यांना लग्न-संसाराच्या जोखडात अवेळी अडकवणे हे या कळ्या अकाली खुडून टाकण्यासारखेच. आपली मुले लवकर त्यांच्या त्यांच्या पायावर उभी राहावीत, लवकर मार्गी लागावीत अशी पालकांची अपेक्षा असण्यात चुकीचे काहीच नाही.

# आरोग्याचे डोही : 'पॅथी'चा संघर्ष की संवाद?

वैद्यक शिकू इच्छिणाऱ्या कुणालाही त्या नव्या ज्ञानाची वाट बंद होता नये. पर्यायी वैद्यक शिकणाऱ्यांनाही नव्या शास्त्राचं ज्ञान मिळायला हवं..

''झाली का अॅडमिशन? छान छान! अरेच्चा! होमिओपॅथी घ्यावं लागलं का? अरेरे! थोडा अभ्यास जास्त केला असतास तर एमबीबीएसला मिळाली असती ना रे!'' जानेवारी महिना आला की व्यावसायिक प्रवेशपरीक्षांचे वेध लागतात. वैद्यकशाखांत प्रवेश मिळावा म्हणून लाखो मुलं जिवापाड मेहनत घेतात, पण प्रवेश मात्र काही हजार विद्यार्थ्यांनाच मिळतो. संपूर्ण भारतात मिळून एमबीबीएसच्या जागा लाखाच्या आतच आहेत- त्याहीपैकी ४८ हजारांहून अधिक खासगी महाविद्यालयांत. पण २०१४ सालापासून सुरू झालेल्या 'आयुष' विद्यापीठांच्या जागा ५२ हजारांच्या आसपास आहेत. तेवढेच अधिक डॉक्टर्स तयार व्हावेत, ते खेडोपाडी पोहोचावेत आणि तिथल्या लोकांना वैद्यकीय सेवा मिळावी हे सरकारचं त्यामागचं उद्दिष्ट आहे. मुलांनाही त्याचा दिलासा वाटतो. अनेकांचं डॉक्टर व्हायचं स्वप्न त्यामुळे साकार होतं.

'आयुष' विद्यापीठांत आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी, सिध्द या पूर्वापार चालत आलेल्या वैद्यकशाखा आणि त्यामानाने नवी, पाश्चात्त्यांकडूनच आलेली होमिओपॅथी यांचं शिक्षण दिलं जातं. तसं रीतसर शिक्षण दिल्यामुळे त्या पर्यायी शास्त्रांचं पुनरुज्जीवन होईल, त्यांच्या औषधांचा अज्ञानी जनसामान्यांकडून जो अनिर्बंध, वारेमाप वापर होतो त्यावर जाणकारांचा वचक बसेल आणि त्या औषधांना नवे कठोर निकष लावून सर्वमान्य करून घेता येईल, अशीही सरकारची अपेक्षा आहे. प्रत्यक्षात मात्र काही वेगळंच घडतं.

सल आणि न्यूनगंड

'आयुष'मधले विद्यार्थी एकदा डॉक्टर झाले की त्यांना संशोधनात जन्म घालवणं किंवा गावाकडे समाजसेवेसाठी जाणं पसंत नसतं. त्यांच्यातले बहुसंख्य विद्यार्थी शहरातच दवाखाना थाटतात. मग त्यांच्यावर तिथल्या समाजाच्या अपेक्षांचा मानसिक दबाव येतो. त्यांना रक्तदाबमापक, स्टेथोस्कोप, ग्लुकोमीटर वगैरे आधुनिक यंत्रं वापरणं, नव्या वैद्यकशास्त्रातली क्रोसिन, अॅम्पासिलिनसारखी औषधं, कॅल्शियम, बी-कॉम्प्लेक्ससारखी



इंजेक्शनं देणं भाग पडतं.

होमिओपॅथीच्या अभ्यासक्रमात नव्या औषधशास्त्राचा समावेश नाही. युनानी, सिद्ध वगैरे पर्यायांत तर नव्या वैद्यकशास्त्राचा अंतर्भावच नाही. डॉक्टर होऊ इच्छिणाऱ्या त्या विद्यार्थ्यांना नव्या वैद्यकाचा अभ्यास करण्याची संधी मिळत नाही. 'पर्यायी शास्त्राचं चार वर्षांचं रीतसर शिक्षण पदरी असूनही आपण नव्या वैद्यकशास्त्राचा बेकायदा वापर करत आहोत,' या अपराधी भावनेचा सल मनस्ताप देतो.

'आयुष' विद्यापीठाच्या आयुर्वेद शाखेचा अभ्यासक्रम फार सुंदर आखलेला आहे. त्याच्यात शरीररचनाशास्त्र, शरीरविकृतिविज्ञान, नवीन औषधशास्त्र, शरीरक्रियाशास्त्र हे सगळं सामावून घेतलं आहे. एमबीबीएसच्या मुलांना तेवढाच अभ्यास करायलाही वेळ पुरत नाही. इथे तर सोबत आयुर्वेदाचाही सखोल अभ्यास अपेक्षित आहे. मुलं कितीही हुशार असली तरी मानवी मेंदूच्या मर्यादा असतात. साडेचार वर्षं त्या सगळ्या अभ्यासाला अपुरी पडणार- मग कुठला तरी भाग कच्चा राहणार. त्या मुलांसाठी दोन शास्त्रांमधल्या वर्ष-सहा महिन्यांच्या खास सेतू-अभ्यासक्रमाचा उ:शाप आहे. पण नव्या वैद्यकाच्या जगड्व्याळ ज्ञानाचा जगन्नाथ-रथ धावायला तो सेतू अपुरा आहे. व्यवसायात मात्र त्यांच्यातल्या बऱ्याचशा मुलांना नव्या वैद्यकपद्धती सर्रास वापराव्या लागतात. 'माझा त्या शास्त्राचा अभ्यास कमी आहे,' हा न्यूनगंड आयुष्यभर छळत राहतो.

भारतातून पर्यायी वैद्यकशाखा बाद होणं शक्य नाही. तो आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग झाला आहे. गेल्या दोन शतकांत विज्ञानाच्या अनेक शाखांमध्ये नवे क्रांतिकारक शोध लागले, अतर्क्य गतीने प्रगती झाली. त्याच काळात नव्या तर्कशुद्ध वैद्यकशास्त्राचा जम बसत होता. त्याला त्या सर्वांगीण वैज्ञानिक प्रगतीचं पाठबळ मिळालं. प्रत्येक आजाराचं अतिसूक्ष्म स्तरावरचं कारण समजलं. अचूक निदानासाठी नेमक्या चाचण्या ठरल्या. आजारावरचा चपखल उपचार बेतणं जमलं. प्रत्येक नव्या निष्कर्षाला कठोर कसोट्यांच्या सक्तीच्या अग्निपरीक्षेची शिस्त लागली. वैद्यक शिकू इच्छिणाऱ्या कुणालाही त्या नव्या ज्ञानाची वाट बंद होता नये. पर्यायी वैद्यक शिकणाऱ्यांनाही नव्या शास्त्राचं ज्ञान मिळायला हवं. गावातल्या माणसाला हृदयविकाराचा झटका आला, कुणी प्रवासी आडवाटेवरच्या अपघातात गंभीररीत्या जखमी झाला तर त्याला नव्या उपचारांचा पर्याय उपलब्ध असायला हवा ना?

त्यासाठी उपचार पद्धतींमधला संघर्ष दूर व्हायला हवा. संघर्ष शास्त्रांत नसतो. तो डॉक्टरांच्या मनांत असतो. डॉक्टरांना जर सगळ्या शाखांविषयी आपुलकी वाटली तर 'इथे आयुर्वेद उत्तम काम करेल', 'इथे होमिओपॅथी योग्य होईल', 'या दुखण्याला योगाने आराम मिळेल' अशी निकोप चढाओढ डॉक्टरांच्या मनात सुरू होईल.

तो वैद्यकसंगम कसा साधायचा?

एमबीबीएस, 'आयुष' वगैरे वैद्यकशास्त्राच्या कुठल्याही शाखेत प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बुद्धिमत्तेच्या, अभ्यासाच्या बाबतीत फारसं डावं-उजवं नसतं. सगळे सारखेच हुशार, अभ्यासू असतात. त्या सगळ्यांना सारखाच अभ्यासक्रम व्यवस्थित झेपू शकतो. म्हणून त्यांना एकसारखाच अभ्यास करायची संधी द्यायची. वैद्यकशास्त्राच्या सगळ्या शाखांमधल्या विद्यार्थ्यांना पहिल्या पदवी परीक्षेसाठी नवं शास्त्रच शिकवायचं. साडेचार वर्षांचं ते शिक्षण झाल्यावर सगळ्यांनाच वर्षभर वैद्यकशास्त्राच्या पर्यायी शाखांच्या मूलतत्त्वांचा अभ्यास रीतसर शिकवायचा. अभ्यासक्रमाचा कालावधी साडेपाच वर्षांचा होईल. पण त्यायोगे विद्यार्थ्यांचं आयुष्य बदलून जाईल. इतरही बरंच साधता येईल. तसंही ब्रिटनमध्ये डॉक्टर व्हायला बारावीनंतर पाच ते सात वर्ष लागतात आणि अमेरिकेत सात वर्ष.

नवं शरीरशास्त्र, औषधशास्त्र यांची पार्श्वभूमी मिळाली की विद्यार्थी अधिक परिपक्व होतील. त्यांची आरोग्याविषयीची, आजारांच्या कार्यकारणासंबंधांविषयीची समज सखोल होईल. त्यानंतर ते पर्यायी वैद्यकशास्त्रं डोळसपणे शिकतील. आयुर्वेद, योग वगैरेंचा अभ्यास मारून मुटकून न होता जिज्ञासेपोटी, उत्साहाने होईल. त्या शास्त्रांचा अधिक अभ्यास करायची त्यांना इच्छा निर्माण होईल. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी नव्या वैद्यकशास्त्रासोबत पर्यायी शास्त्रांचेही सखोल अभ्यासक्रम त्यांना उपलब्ध करून द्यावे.

अमेरिकेत ऑस्टिओपॅथी ही वैद्यकशास्त्राची वेगळी शाखा आहे. तिथल्या अभ्यासक्रमात एमबीबीएससारखाच नव्या वैद्यकशास्त्राचा पूर्ण अभ्यास करावा लागतो. शिवाय त्यांना ऑस्टिओपॅथीविषयी शिकवलं जातं. अभ्यासक्रम लांबलचक, पाच वर्षांचा असतो. मग तीन ते आठ वर्ष इंटर्नशिप करावी लागते. पण पदव्युत्तर शिक्षणासाठी त्यांना ऑस्टिओपॅथी किंवा नव्या वैद्यकशास्त्राची कुठलीही शाखा खुली असते.

इंग्लंड-अमेरिकेत पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना जिल्ह्या-तालुक्यांतल्या रुग्णालयात पाठवतात. आपल्याकडे तशा मोठ्या गावांतल्या रुग्णालयांत रुग्णवैविध्याची लयलूट आहे. परिपक्व होऊन विद्यार्थी तिथे गेले की त्यांना तिथे भरपूर शिकायला मिळेलच, पण रुग्णांनाही निगुतीने उपचार मिळतील. नवी औषधं, आसवं-अरिष्टं किंवा होमिओपॅथीच्या गोळ्या यांच्यातून निवड करायला रुग्णांना वाव असेलच शिवाय त्यांना त्या निवडीसाठी योग्य, अभ्यासपूर्ण, निष्पक्षपाती सल्लाही मिळेल. एक छान विश्वासाचं नातं निर्माण होईल. मग त्या डॉक्टरांना आयुष्यभर तिथेच काम करायला, रुजायलाही आवडेल. गावोगावी जाणकार डॉक्टरांची संख्या आपसूकच वाढेल.

पर्यायी वैद्यकाचा 'धंदा' टळेल..

स्वत:च्या आवडीनुसार पर्यायी वैद्यकशास्त्र निवडणारे विद्यार्थी त्या शास्त्रांचा मनापासून अभ्यास करतील. त्यांच्या अभ्यास पद्धतीला नव्या ज्ञानाची, त्याच्या शिस्तीची बैठक असल्यामुळे ते पर्यायी वैद्यकाकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून बघतील. त्या जुन्या शास्त्रांत ते नवं, मूलगामी संशोधनही करतील. पर्यायी शास्त्रांचा योग्य कस लावून सर्वमान्यता मिळवून देतील. पर्यायी औषधांमधली मर्मतत्त्वं हुडकून त्यांचं पेशींमधल्या सूक्ष्म स्तरावरचं काम ते समजून घेतील. त्या औषधांवर आणि चाचण्या वगैरेंवरही जगन्मान्य कसोट्यांतून पार पडून 'प्रमाणित' झाल्याची कायदेशीर मोहर उमटेल. पर्यायी वैद्यकावर बसलेला छद्मविज्ञान (स्यूडोसायन्स) हा शिक्का पुसला जाईल. नियम कडक होतील. कुणीही सोम्यागोम्या छंद म्हणून पर्यायी वैद्यकाचा 'धंदा' करू शकणार नाही.

'आयुष' विद्यापीठ सुरू करण्यामागची, सरकारला अभिप्रेत असलेली अनेक उद्दिष्टं साध्य होतील. रीतसर नवं-जुनं शास्त्र शिकून पर्यायी वैद्यकाचा व्यवसाय करणाऱ्या कुठल्याही डॉक्टरच्या मनात मग कसलाही न्यूनगंड, अपराधी भावना, उच्च-नीच भाव राहणार नाही. त्या डॉक्टरांना शहरांतही आणि गावांतही सन्मान मिळेल. त्यांच्या सर्वांगीण ज्ञानामुळे बकूआत्यांपासून अभियंत्यांपर्यंत सगळ्यांच्याच मनांत त्यांच्याविषयी आदर असेल. परंपरा, समाज मानसिकता, आरोग्य आणि विज्ञान या साऱ्यांनाच योग्य न्याय मिळेल.

■ ■ ■

# राजकीय पुढाऱ्यांनो प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन देशसेवा करा.



चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्मा च्या नवीन वर्षा चीसुरुवात,या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षा चे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.महाराष्ट्रात नवीन वर्ष "गुढीपाडवा" म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो.याच महिण्यात चैत्र शुध्द नवमीला श्रीरामाचा जन्म झाला.त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला.म्हणजे चैत्र महिन्यात मर्या दापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जयंती मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्या दापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे.भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती,सन्मान,सभ्यता,संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते.कारण भारतात सर्व च धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात.त्यामुळे संपूर्ण हिदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता व हे संपूर्ण काम कायद्याच्या चाकोरीतून होवून राम मंदिर उभारल्या जात आहे.आज भारतात हिंदू धर्मा मध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वा दानेच.यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.यामागे फक्त प्रभूराचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल. प्रभूराचंद्राचा आशिर्वा द भारतीयांना आहे.त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील.कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्त्व विभागाने जाहीर केले आहे.श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो.त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात,आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन,निसर्ग,वन्यप्राणी,मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो.त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते.कारण भारतात सर्व च धर्मांच्या देवी-देवतांचा व थोरमहात्म्याचा वास आहे.त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.आज जगात भारत विश्व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभूराचंद्रांच्या आदर्शा मुळे.त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्मा ला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य होणार आहे की संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण होणार आहे.त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर राहील.त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे.त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्मा ण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे.भारतातील प्रत्येक धर्मा च्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने 14 वर्षे वनवास भोगला,वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्व नाश केला,रूषि-मुनी,साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले,रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभूराचंद्राची धुंद गुंजतांना दिसते.तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार होत आहे हे हिंदू धर्मा चेअहोभाग्यच म्हणावे लागेल.आज अयोध्येतील राम मंदिरमुळे "मन में राम,तन मे राम,घर-घर मे राम" या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे.आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो.यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे.श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभुश्रीरामचंद्रांना मर्या दापुरुषोत्तम म्हटल्या जाते.प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे.त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक यांनी जनसेवा करण्याची नितांत गरज आहे.कारण देशातील 98 टक्के राजकीय पुढारी अहंकारी वृत्तीचे असल्याचे दिसून येते.या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवे पेक्षा स्वतःची सेवा करण्यात गुंग(मग्न) असतात."मु मे राम बगल में छुरी" अशा प्रकारची असुरी भावना त्यांच्यात दिसून येते.कारण गरीब व सर्व सामान्यांचे रक्त पीवुन आजचा राजकीय पुढारी "रक्तबीज" राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते.त्यामुळेच आज देशातील प्रत्येक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे.यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी,भुकमरी,महागडे शिक्षण,शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.मी रामनवमीच्या निमित्ताने देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी यांना विनंती करतो की रामराज्याची संकल्पना साकार करायची असेल तर आपण वाममार्गा नेकमवीलेला संपूर्ण संपत्तीचा त्याग करून सरकारच्या तिजोरीत जमा करावा किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावा यातच खरे प्रभु श्रीराम यांचे दर्शन दिसून येईल.त्याचप्रमाणे भुकेलेल्यांना अन्न हा देवी-देवतांचा मुलमंत्र आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वीकारला पाहिजे.राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार, गरिब व सर्व सामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल.जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.याकरीता भ्रष्टाचारावर आळा व अहंकारी राजकीय पुढाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची कठोर चौकशी करून यांची संपत्ती जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे. यातच आपल्याला रामराज्य खऱ्या अर्था ने दिसून येईल. आजचा राजकीय पुढारी स्वार्थी झाल्यामुळे व यांच्यात असुरी शक्ती निर्मा ण झाल्याने देशात अनेक नवीन-नवीन समस्या निर्मा ण झाल्या आहेत.त्यामुळे देशाच्या 135 कोटी जनतेला आज महागाईचा श्राप बसल्याचे दिसून येते.या असुरी शक्तीला संपवायचे असेल तर प्रभु रामचंद्राचे आदर्श सामोरं ठेऊन राजकीय पुढाऱ्यांनी समाजकार्य करायला हवे.तेव्हाच भारतात रामराज्य प्रस्थापित होईल.रामनवमीच्या पावन दिवसांचे औचित्य साधून संपूर्ण रामभक्तांनी, सामाजिक संघटनांनी, प्रशासनाने व सरकारने आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून एक आगळावेगळा उपक्रम राबविला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित होईल व आपल्याला प्रत्येक पानात, फुलात,फळात प्रभु श्रीरामचंद्रांचे दर्शन अवश्य होईल.कारण निसर्गा च्या सान्निध्यातच प्रभु रामचंद्र आहेत.

**लेखक. रमेश कृष्णराव लांजेवार**

## आटपाडीत गावठी पिस्तुलासह तीन जिवंत काडतुसे घेऊन जाणाऱ्या दोघांना अटक, साडेसात लाखांचा मुद्देमाल जप्त




सांगली जिल्ह्यातील आटपाडीमध्ये गावठी पिस्तुलासह तीन जिवंत काडतुसेघेऊन जाणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली आहे. सांगलीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पथकाने या दोघांना मोठ्या शिताफीने पकडले. पन्नास हजार रुपयांचे गावठी पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि चारचाकी असा एकूण साडेसात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परशुराम रमेश करवले आणि रविराज गोरवे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. सांगली जिल्ह्यात अवैधरित्या शस्त्रांची तस्करी करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ.बसवराज तेली यांनी दिले आहेत. त्यानुसार एलसीबीचे निरीक्षक सतीश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली खास पथके तयार करण्यात आली आहेत. पथकातील सहाय्यक निरीक्षक संदीप शिंदे यांचे पथक आटपाडी परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी आवळाई रस्त्यावर एक जण चारचाकीतून गावठी पिस्तूल विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती पथकातील अंमलदार सचिन कनप यांना मिळाली. त्यानुसार तातडीने पथकाने गुरुकुल शाळेजवळ सापळा रचला. झडतीदरम्यान गावठी पिस्तूल सापडली त्यावेळी एक काळ्या रंगाची चारचाकी संशस्यास्पदरीत्या आढळून आली. त्यातील परशुराम करवले आणि रविराज गोरवे या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पथकाने अंगझडती घेतली असता परशुराम करवले याच्याकडे गावठी पिस्तूल संशयास्पदरीत्या आढळून आली. ही पिस्तूल आपण आणि रविराज गोरवे याने विक्रीसाठी आणल्याची त्याने कबुलीही दिली.

## १२६ ग्रम वजनाचा २५,२०,०००/-रु. किंमतीचा एम.डी. (मफेड्रान) हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपींवर कारवाई अमली पदार्थ विरोधी कक्षाची कामगिरी'




मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गतनालासोपारा परिसरात अंमली पदार्थ खरेदी विक्री करणाऱ्या ईसमांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरीष्ठांनी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दि.२५.०३.२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे यांनी कायदेशीर बाबीची पुर्ततकरुन पोलीस पथकसह नालासोपारा परीसरात रवाना होवुन गस्ती दरम्यान नालासोपारा (पुर्व), सेंट्रल पार्क येथील श्रीगणेश अपार्टमेंट जवळ रोड लगत एक ईसम त्याचे हातात काळया रंगाची प्लस्टीकची पिशवी बाळगला असताना मिळुन आला तसेच तो कोणाची तरी वाट पाहत असल्याचे निर्दशनास आले तसेच त्याचे हालचाल संशयास्पद वाटत असल्याने त्याचेकडे कोणतातरी अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्मा ण झाल्याने त्यास ताब्यात घेवुन तात्काळ दोन पंचांना बोलावुन घेवुन छापा पंचनामा दरम्यान ईसम गितेश अनंत प्रभु रा.टिटवाळा (पुर्व) याचे कब्ज्यात १२६ ग्रमवजनाचा २५,२०,०००/ रु. किंमतीचा मफेड्रानहा अंमली पदार्थ व्यापारी प्रमाणात विक्री करीता कब्जात बाळगला असताना मिळुन आले असुन सदर अंमली पदार्थ अंग झडती पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला असुन नमुद ईसमा विरुध्द 'एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ (क) प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा नोंदक्र. ॥ २६३/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे. सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधीकक्षाचे प्रभारी पो.नि/अमर मराठे, सपोनि/विलास कुटे, अमोल आंबावणे, पो.हवा./टक्के, पो.हवा./आव्हाड, पो.हवा/पाटील, पो.हवा./ इंगळे, पो.हवा./ पाटील, पो.हवा/ सपकाळ, मपोहवा/ एक्कलदेवी व पो.शि/यादव यांनी केली आहे.

## माज्यावर प्रेम कर अन्यथा घरच्यांना जिवंत सोडणार नाही, मुलीच्या वडिलांना घरात घुसून मारहाण; कोल्हापुरातील प्रकार



कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन तसेच एकतर्फी प्रेमातून छेडछाड आणि धमकावण्याचे प्रकार सुरुच आहेत. याच जाचातून कंटाळून आत्महत्या केल्याची घटना ताजी असतानाच आता करवीर तालुक्यातील एका गावामध्ये धक्कादायक प्रकार घडला आहे. धमकीचा मेसेज मोबाईलवर पाठवून नंतर संबंधित मुलीच्या वडिलांना घरात घुसून मारहाण (Girl Family Threatened) केल्याची घटना घडली. या प्रकरणी करवीर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. संशयीत शंतनू निगडे (वय 22) याने अल्पवयीन मुलीला माझं तुझ्यावर प्रेम आहे. तू माझ्यावर प्रेम कर, नाहीतर तुला व तुझ्या घरच्यांना जिवंत सोडणार नाही, असा मोबाईलवर मेसेज पाठवला. त्या मुलीचा पाठलागही केला होता. यानंतर या तरुणाने त्याच्या नातेवाईकांसह शालेय मुलीच्या घरात घुसून तिच्या पालकांना बेदम मारहाण केली. संबंधित मुलीच्या आईने करवीर पोलिस ठाण्यात फिर्या द दिलीआहे. एकतर्फी प्रेमातून सातत्याने पाठलाग

संशयित शंतनू निगडे (वय 22) अल्पवयीन मुलीचा सातत्याने पाठलाग करत होता. परीक्षेला जातानाही तिच्या मागून बाईकने जात पाठलाग करत होता. तसेच मुलीला मोबाईलवर मेसेज पाठवून तिच्या कुटुंबियांना धमकी दिली होती. त्यामुळे मुलीने मेसेजची माहिती कुटुंबियांना दिली. त्यामुळे कुटुंबियांनी विचारणा केल्यानंतर नातेवाईकांसमवेत मुलीच्या घरात घुसून मारहाण केली. पोलिसांनी याप्रकरणी संशयित शंतनू सर्जेराव निगडे, शहाजी रामचंद्र निगडे, सोहम शहाजी निगडे, संगीता शहाजी निगडे, अजिंक्य निगडे, सर्जेराव रामचंद्र निगडे, किरण दिवाकर निगडे, शोभा सर्जेराव निगडे, रेखा दिनकर निगडे, अनुराधा निगडे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. कोल्हापुरात गुन्ह्यांची मालिका


दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूर जिल्ह्यात एकतर्फी प्रेमातून मुलींची छेडछाड करणे, त्रास देणे, कुटुबांना धमकावणे, सोशल मीडियातून बनावट अकाउंट सुरू बदनामी करणे सुरुच आहे. त्यामुळे अशांना जागीच अद्दल घडवण्याची मागणी होत आहे. कोल्हापूर शहरातील बोंद्रेनगरात एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या छळाला कंटाळून 19 वर्षीय मुलीने चुलत्याच्या घरी आत्महत्या केली. त्यानंतर एकाच मुलीची 12 फेक इन्स्टा अकाउंट काढून मुलीची बदनामी केल्याचे समोर आले होते. या प्रकरणानंतर पीडित मुलीने तक्रार केल्याने प्रकरणाला वाचा फुटली. मात्र, अशा मानसिक छळाच्या बहुंताश तक्रारी होत नसल्याने आणि बदनामीच्या पोटी सहन केल्या जात आहेत, अशी परिस्थिती आहे.

## 'केमिकलमध्ये नोटा डबल होतात', असं म्हणत केली हजारो रुपयांची फसवणूक; 5 आरोपींना अटक

केमिकलमध्ये नोटा ठेवल्यास त्या डबल होतात असं म्हणत लोकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गोंदिया जिल्ह्यातील रावणवाडी पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या कोरणी घाट परिसरात ही घटना घडली आहे. याप्रकरणी 5 गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सातोना येथील दीपांशु उरकुडे यांना काही लोकांनी नोटा एका केमिकलमध्ये ठेवल्यास काही तासात त्या नोटामधून अडीच लाख रुपये तयार होतात, अशी बतावणी




केली. त्यानंतर दिपांशु याच्याकडून या भामट्यांनी 10,000 रुपये घेऊन एक केमिकल टाकलेले नोटांचे बंडल पॅक करून दिले आणि 2 तासांनी उघडून बघायला सांगितले. दिपाशुने 2 तासानंतर बंडल घडून पाहिले असता त्यात कागदी नोटा दिसून आल्याने आपली फसवूणक झाल्याचे त्याच्या लक्षात आले. यानंतर त्याने थेट पोलिसात (police) धाव घेत याप्रकरणी गुन्हा दाखल केला. दीपांशूने आरोपींनी फसवणूक (Crime News) करून 10,000 रूपये रोख रक्कम घेऊन स्विफ्ट चारचाकीने गोंदियाच्या (gondia district ) दिशेने पसार झाल्याचे सांगितले. ही माहिती प्राप्त होताच घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन चारचाकी मधून पसार झालेल्या गुन्हेगारांचे शोध घेऊन गुन्हेगारांना तात्काळ अटक करण्याच्या सूचना पोलीस (police) अधीक्षकांनी दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने पथक तयार करुन तपासाला सुरवात केली असता गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे बालाघाट टी पॉईट, गोंदिया (gondia district ) येथे सापळा रचून नाकाबंदीत स्विफ्ट कार रावणवाडी येथून गोंदियाच्या (gondia district ) दिशेने येताना दिसून आली. या चारचाकी कारमध्ये 5 व्यक्ती संशयितरित्या आढळून आल्याने त्यांची चौकशी करण्यात आली. चौकशीत पोलिसी खाक्या दाखवत दिपांशु याची जी फसवणूक झाली आहे, याबाबत त्यांना विचारले असता, या पाचही जणांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.



## माहिती दिली नाही म्हणून पाटबंधारेच्या कार्यकारी अभियंत्याविरुध्द गुन्हा दाखल...

**औरंगाबाद : (प्रतिनिधी)**

पाटबंधारे विभाग कार्या लयातील कार्यकारी अभियंता अनिल निंभोरे यांच्या विरुद्ध कायदेशीर तक्रारीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी एन.२. सिडको परिसरातील भारत भिमराव दाभाडे यांनी केली असून या संदर्भा त त्यांनी औरंगाबाद शहर पोलीस आयुक्त तसेच जवाहरनगर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांना तक्रार देखील दिली आहे.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे - सर्व शासकीय कार्या लयामध्ये जन माहिती अधिकारी,अपिलीय अधिकारी इत्यादी प्रमाणे एक प्रणाली कायदयाने असस्थित्वात आलेली आहे. सदर कायदया प्रमाणे जनतेला माहितीचा अधिकार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. शासनाचा कारभार स्वच्छ,प्रांजल,पारदर्शक आणि जवाबदारीने चालु आहे. याबददल हा अधिकार असून या कायदयानुसार मागीतलेल्या माहितीची अर्जदाराला विविध मुदतीमध्ये माहिती प्रदान करण्याची कायदेशीर जबाबदारी संबंधित अधिका-यांवर कायदयाने बंधनकारक आहे.

माहितीचा अधिकार या कायदयाप्रमाणे माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्या विरुध्द करण्यात येणारी - कायदेशीर कार्यवाही ही स्वतंत्र आहे. तसेच माहिती




न देणा-या अधिका-यांवर देशाच्या भारतीय दंड संहिता प्रमाणे उल्लंघन होत असल्यामुळे त्यांचे विरुद्ध सदर कायदयाअंतर्गत स्वतंत्रपणे कार्यवाही करता येवु शकते व तशी कार्यवाही करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दि. २७/२/२०१५ च्या निकालानुसार स्पष्ट होते. सदर निकाल विवेक विष्णुपंत कुलकर्णी विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या केस मध्ये रिट याचीका क्रमांक ६९६१/२०१२नुसार असुन सदर निकाल २०१५(४) महाराष्ट्र लॉ जनरल पृष्ठ क्रमांक ६३ वर सदर निकाल नमुद आहे. उच्च न्यायालयाने दिलेला निकाल हा सर्वा वरबंधनकारक आहे.

अर्जदाराने दि.०४/११/२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ६ (१) प्रमाणे - विविध नमुना नंबर १ नुसार औरंगाबाद पाटबंधारे विभाग,औरंगाबाद यांचे कार्या लयातील जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, यांच्याकडे कायदेशीररीत्या मागणी केली की, त्यांना सन २०२०-२१ ते २०२१-२२ या कालावधीत औरंगाबाद पाटबंधारे विभाग,औरंगाबाद या कार्या लयाससन २०३०-२१ ते २०२१-२२ या वित्तीय वर्षा तएकुण प्राप्त झालेला निधी व त्या अनुषंगाने वितरीत करण्यात आलेला निधी, त्याची लेखाशिर्षकानिहाय वितरण यादी व रोकड वहीच्या छायांकित प्रती प्रमाणीत करुन मिळणे बाबत अर्ज केलेला आहे.

मात्र कायदयाने बंधनकारक असतांना देखील - सदर जनमाहिती अधिकारी यानी सदर माहिती अर्जदाराला / तक्रारदाराला दिलेली नाही. या प्रमाणे सदर जनमाहिती अधिकारी यांनी कायदयाने त्यांच्यावर घालुन दिलेले बंधन तोडलेले आहे व कायदयाचे उल्लंघन केलेले आहे. यानुसार कायदयाला अभिप्रेत असलेली कार्यवाही सदर जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही. त्यामुळे भारतीय दंड संहितेच्या कलम १६६, १८८, १७५, १७६ आणि २१७ चा भंग केलेला असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. यासह विविध तक्रारीची नोंद या तक्रारीत करण्यात आली असून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## कुंपणंच शेत खातंय? पोस्ट कर्मचाऱ्यांनी केला लाखोंचा घोटाळा; पुण्यात सात जणांवर गुन्हा दाखल

उप पोस्ट ऑफिसमध्ये आलेल्या गुंतवणुकदारांनी केलेली गुंतवणुक ही मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये केलेली आहे, असे सांगून त्यावर परस्पर कमिशन घेऊन पोस्ट खात्याची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तब्बल 23 लाख 76 हजार 215 रुपयांची पोस्ट खात्याची फसवणूक केली असल्याची माहिती आहे. याप्रकरणी विश्रांतवाडी आणि विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगेश नानारसाहेब वीर यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार दिघी उपपोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्तर ज्योतीराम फुलचंद माळी , क्लार्क भगवान श्रीरंग नाईक, धानोरी पोस्ट मास्तर गणेश तानाजी लांडे, धानोरी पोस्ट मास्तर मधुकर गंगाधर सूर्यवंशी, रमेश गुलाब भोसले , विलास एस देठे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोस्ट ऑफिसमध्ये गुंतवणुकदारांनी गुंतवणूक केली तर त्यामध्ये 2 टक्के कमिशन पोस्ट मास्तरांना मिळते. या नियमाचा गैरफायदा घेऊन दिघी पोस्ट कार्या लयात16 जुलै 2018 ते 21ऑगस्ट 2020 दरम्यान दिघी उपपोस्ट ऑफिसमध्ये 274 गुंतवणुकदारांनी 9 कोटी 62लाख 98 हजार रुपयांची गुंतवणूक पोस्टाच्या वेगवेगळया योजनांमध्ये केली होती. त्यांना धानोरी शाखा पोस्ट ऑफिस येथे खाते उघडण्यास लावल्याचे दाखविले. त्या रक्कमेपोटी 18 लाख 35 हजार 115 रुपये धानोरी पोस्ट ऑफिसास दिले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्क:-9594418181 / 8424989898